## जन्म-मृत्यू

माझे, मीपण, अगाध कीर्ती
थेम्ब जसा की अळवावरती
परी चिकटला चित्ती-वृत्ती
घेऊन जाईन म्हणतो अंती |

उडती वरती, कशात विरती ?
फुगे भ्रमांचे अवतीभवती
सुखदुःखाची रंगीत नाती
वारा पाहुनी ढंग बदलती |

मोह मायेच्या अभेद्‌य भिंती
त्यातच मिळते निरर्थ तृप्ती
किती मिळवता? कोण मोजती?
उरते माती थकल्या हाती |

आयुष्याच्या निगूढ गणिती
प्रत्येकाची एकच प्रचिती
कोणी कुणाचे नाही सोबती
उत्तर हाती, तरीही शोधिती |

मंतरलेल्या क्षणांसभोती
कुतूहलमिश्रित अनाम भीती
कालप्रवाही काही न उरती
निव्वळ रेषा पाण्यावरती |

**- संध्या रानडे**